# वार्षिक अहवाल : २०१५-२०१६



स्वामी विवेकानंद विद्यालयाची पूर्णत्वास येत असलेली नवीन वास्तु



जुनी वास्तु



हर नगर ग्राम में
दीप से दीप जलाएंगे।

# राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्था

शिक्षण-संस्कार-आरोग्य-कृषी-स्वावलंबन आधारित ग्रामविकास

www.mulshigramvikas.org



# राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्था, ता. मुळशी - कार्यवृत्तांत २०१५-२०१६

संस्थेचा २०१५-१६ चा वार्षिक अहवाल सादर करताना आनंद होत आहे. यावर्षी शाळेच्या इमारतीचे नूतनीकरण केले आहे. संस्थेने २०१२ ऑक्टोबर पासून बीड व धाराशीव जिल्ह्यात आपल्या कामाच्या विस्तारास सुरुवात केली. त्याची चांगली उपलब्धी आता दिसू लागली आहे. त्याचप्रमाणे मुळशी तालुक्यातील वनवासी बांधवांसाठी यावर्षी वनवासी कल्याण आश्रमाच्या सहाय्याने वसतीगृह ही सुरु करण्यात आले आहे. याविषयीची सविस्तर अहवाल सादर करत आहोत.

## स्वामी विवेकानंद विद्यालय - आसदे

### (श्री सतीश शिंदे)

यावर्षी शाळेत २२५ विद्यार्थी होते. १०वीत ४१ पैकी ४० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. भाग्यश्री ठोंबरे ९२टक्के, गुण मिळवून प्रथम आली. क्रिडा स्पर्धा - ४ सामूहिक, ४ वैयक्तिक स्पर्धातून एकूण ३५ पदके मिळवण्यात आली. बौद्धिक स्पर्धा - चित्रकला (१६ पैकी १४ उत्तीर्ण), एन टी एस (५ पैकी २ उत्तीर्ण) एन एम एम एस ६ पैकी २ व एक विद्यार्थिनी - शिष्यवृत्ती परिक्षेत पात्र ठरली.

**सांस्कृतिक कार्यक्रम** - स्नेहसंमेलन, भोंडला, जागतिक महिला दिन, शरद मल्हार स्पर्धा, आंतरशालेय नाट्य स्पर्धा, डॉ. आंबेडकर पुण्यतिथी, विवेकानंद जयंती असे एकूण ४६ कार्यक्रम झाले.

**प्रसिद्ध सतारवादक उस्मान खान** यांचे दिनविशेष शास्त्रीय संगीतातील वाद्य परिचय, शाडूच्या गणेश मूर्ती निर्मिती, मंडपसजावट रोटरीचा रायला (व्यक्तीमत्त्व विकास शिबीर) श्री सुनीलजी चिंचोलीकर यांचे व्याख्यान स्वा. सावरकर चित्रपट दाखवणे असे अनेक विशेष कार्यक्रम यावर्षी झाले. यावर्षी शाळेच्या एक मजली इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे.



**विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या श्रीगणेश मूर्ती**



**इ. १० वी च्या विद्यार्थ्यांचा शुभेच्छा समारंभ**



**२६ जानेवारी निमित्त शारिरीक प्रात्यक्षिके**



**संगीत साहित्याची ओळख**



**चार सूत्री भात लागवड प्रात्यक्षिक**



**आरोग्य तपासणी**

त्यामुळे विद्यार्थ्यांची चांगली सोय होईल. यासाठी मुंबईतील रिलायन्स कॅपिटलचे अर्थसहाय्य झाले आहे त्याशिवाय त्यांनी भरीव अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिल्यामुळे हे काम पूर्ण होऊ शकले.



**आयबीटी सेंटर - (श्री. वसंत बोराडे)** - ८, ९ व १० वीच्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण संस्थेच्या माध्यमातून गेली ८ वर्षे देत आहोत. त्यांच्यातील कौशल्याचा विकास व्हावा. आणि पुढे त्यांच्यातील उद्योजक जागा व्हावा. ही त्या मागची कल्पना आहे. वेल्डिंग, कटींग, इलेक्ट्रीकल, शेती तसेच काही वस्तू तयार करणे. भाजी लावण्यापासून भाजी विक्रीचा अनुभव दिला जातो.

**वसतिगृह (श्री अशोक गोजरेकर)** - शिळेश्वर येथील मुलींच्या वसतिगृहात २१ मुली, मुलांच्या वसतिगृहात ८ मुले आहेत. माले येथे १८ मुले होती. वसतिगृहातील १०वी उत्तीर्ण झालेल्या २ मुलींना परिचारिका शिक्षणासाठी मंगलोर येथे पाठविण्यात आले.



**बाल विद्या मंदिर (सौ. विद्या देशपांडे व सौ. राजश्री गरुड)** - भैरवनाथनगर, पिरंगुट येथील चालू असलेल्या बालवाडीत २९ मुलांनी लाभ घेतला. दरवर्षीप्रमाणे दिंडी, स्वातंत्र्य दिन, रक्षाबंधन, गणेश उत्सव, भोंडला, तीळगुळ स्नेहसंमेलन असे विविध १६ कार्यक्रम घेण्यात आले. योग्य मार्गदर्शन केल्यामुळे आपल्या बालवाडीतील मुले मातृभाषेतच भावी शिक्षण घेतात असे लक्षात येत आहे.





चिमुकल्यांचा पालखी सोहळा

---

**श्रीशिवसमर्थ पुरुष बचत गट (श्री. संतोष केसवड)** - २००९ साली सुरु केलेल्या पुरुष गटाने सात वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण करून या वर्षी सुमारे साडे तेरा लाख रुपयांची बचत सर्व सदस्यांना वितरित करुन यावर्षी पासून गटाच्या आर्थिक व्यवहाराला नव्याने सुरुवात करण्यात आली. यात ४६ सदस्य सहभागी झाले आहे.



**हिम्मत शाळेच्या विद्यार्थ्यांना विद्युत शास्त्र विषयांचे प्रशिक्षण**



**संस्कार प्रतिष्ठानच्या विशेष मुलांना राख्या बांधताना हिम्मत शाळेचे विद्यार्थी**



**जागतिक सूर्यनमस्कार दिनाच्या निमित्ताने सूर्यनमस्कार**



**१५ ऑगस्ट या दिवशी किल्ले तुंगवर विद्यार्थ्यांचे भोजन**

## हिम्मत शाळा (श्री किशोर जाधव)

संस्थेच्या अंबडवेट - सुतारवाडीतील प्रमुख कार्यालयात हिम्मत शाळा सुरु करुन चार वर्षे होत आहेत. गेल्या वर्षीच्या यशानंतर यावर्षी ३८ विद्यार्थ्यांनी आपल्या माध्यमातून १७ क्र. अर्ज भरला त्यापैकी २७-२८ विद्यार्थी नियमितपणे वर्षभर आले व त्यापैकी २१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ३ मुली प्रथमवर्गात उत्तीर्ण झाल्या आहेत. या शाळेमुळे व्यसनाधीन, भरकटलेली, मार्ग चुकलेली मुले मुख्य प्रवाहात आणण्यात चांगले यश येत आहे. शालेय शिक्षणाबरोबरच गड-किल्ले भ्रमण-व्यवस्थापन, विद्युत उपकरण दुरुस्ती, कृषी प्रशिक्षण व अनेक लहान मोठे उपक्रम घेतले जातात. त्यातून विद्यार्थ्यांना जीवन शिक्षण देणे, भावी जीवनाचा आलेख ठरवणे, संस्कारित करणे असे अनेक विषय हाताळले जात आहेत.

## कातकरी वस्ती विकास (श्री. सचीन आकरे)

गेली दोन तीन वर्ष मुळशी तालुक्यातील ४८ पैकी २० कातकरी वस्त्यांचे सर्वेक्षण संस्थेच्या माध्यमातून केले जात आहे. त्यातून अशा मुलांसाठी वसतीगृह सुरु करण्याचा विषय पुढे आला. वनवासी कल्याण आश्रमाला आपण यासाठी बरोबर घेऊन सुरवातीस आपल्या माले येथील वसती - गृहात १८ मुलांची सोय केली. दुसऱ्या सत्रात वनवासी कल्याण आश्रमाने माले येथील सेनापती बापट शाळे जवळच नवीन वास्तूत हे वसतीगृह हलवले.





**पौड कातकरी वस्ती येथे संस्कार वर्ग व वृक्षारोपण**

त्याचप्रमाणे जीवनसंवर्धन संस्थेने क्वीकहिलच्या सहाय्याने पौड येथील कातकरी वस्तीसाठी समाज मंदिराचे बांधकाम केले व तेथे आपलाच एक कार्यकर्ता सचीन आकरे याच्या माध्यमातून कातकरी वस्ती विकासाचे काम आता करु लागला आहे.

आपण अमराळे वाडीतील मोहोळ वस्तीत गेल्या दहा वर्षापासून करत असलेल्या प्रयत्नांना आता मूर्त स्वरुप येऊ लागले आहे. मुळशीतील कातकरी वस्त्यात यापुढे नक्कीच बदल दिसू लागेल असा विश्वास वाटतो.

## मराठवाडा विकसन प्रकल्प

### (श्री जयंत पाटील व श्री लक्ष्मण काटे) -

२०१२ पासून मराठवाड्यातील बीड व धाराशीव या दोन जिल्ह्यात शेती सुधारणा व जलव्यवस्थापन विषयांना धरुन कामास सुरवात केली. यावर्षी शिक्षण-संस्कार विषयाची त्यात भर पडली आहे. संस्थेचे बीडमधील ११ पैकी ८ व उस्मानाबाद मधील सर्व ८ तालुक्यात संपर्क जाळे निर्माण झाले आहे. प्रत्येक तालुक्यात ५ ते १५ गावातून संपर्क व्यक्ती निश्चित करण्यात आल्या आहेत. यावर्षी दोन्ही जिल्ह्यात मिळून ४० गावे व २०० शेतकरी आपण सुचवत असलेला शुन्य खर्च गो आधारीत शेती प्रयोग करतील असा प्रयत्न केला. प्रत्यक्षात दोन्ही जिल्ह्यात मिळून १५ तालुक्यातील ३९ गावी १५४ शेतकऱ्यांनी जीवामृत गोमूत्र फवारणीचे प्रयोग केले व त्यांना चांगले यश मिळत असल्याचे जाणवले.

**काही यशस्वी उदाहरणे** - किरण शिंदे - सरमकुंडी फाटा - सेंद्रीय गुलाब निर्मिती, मोहन भैरट - विजोरा ३ गुंठ्यात मिरचीतून ८७००० रु. उत्पन्न, हळद, द्राक्षे, ऊस, कांदा, डाळींब, भेंडी अशा विविध पिकांवर हे प्रयोग झाले आहेत.

**शिक्षण संस्कार** - बीड शहरात चालणाऱ्या वसतिगृहात विद्यार्थ्यांवर देशभक्ती-समाजभान-व्यक्तीमत्व विकासासाठी संस्कारक्षम कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा नवीन प्रयोग ठरवला होता. १२ वसतिगृहात १५ तज्ञांच्या आधारे ४९ कार्यक्रम वर्षभरात झाले. यातून चांगला उत्साह वसतिगृह प्रमुख व विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होत असल्याचे जाणवत आहे. १०वी च्या ३५ मुलांची कल चाचणी श्री. अरविंद देशपांडे यांच्या सहाय्याने घेण्यात आली. आत्महत्याग्रस्त कुटूंबाचे आपण गेल्या वर्षी सर्वेक्षण केले होते. त्यापैकी २ गरजू कुटुंबांना रु. १००००/- प्रत्येकी (महाविद्यालयीन फीसाठीचे पैसे) श्री. एम. डी. देशपांडे यांच्या सहकार्यातून उपलब्ध करुन दिले.



**शेतकरी मेळाव्यात जीवामृत तयार करण्याचे प्रात्यक्षिक**



**उस्मानाबाद येथील नेहरु युवा केंद्रात कार्यकर्ता प्रशिक्षण**



**कलदेव निंबाळा येथील सेंद्रिय डाळिंब शेती व शेतकरी बैठक**





बीड येथील निवासी प्रकल्पामध्ये 'शिदोरी संस्काराची' हा उपक्रम वर्षभर सातत्याने घेण्यात आला.

## कृषी विभाग (श्री. प्रशांत पाटील)

मुळशी तालुक्यातील ७ गावातून १२५ शेतकऱ्यांनी शेती प्रयोगात सहभाग घेतला. चतुःसूत्री भात, मल्चींग पेपर उपयोग, जीवामृत-गोमूत्र फवारणी, असे विविध नवनविन प्रयोग शेतकरी आंगीकारत आहेत. रोटरी क्लबच्या सहाय्याने शेतकरी मेळावा, ६ गावात ९०० कोंबड्यांची लसीकरण, ताग पेरणी, फळबाग लागवड, गादी वाफे वापर, असे विविध विषय शेतकरी स्वीकारत आहेत.



शाळेतील विद्यार्थ्यांनी कलम बांधणीचे प्रात्यक्षिक



खुबवली येथील नैसर्गिक झेंडूंची फुलशेती



घोटावडे येथील शेतात भात लागवडीस मदत करताना हिम्मत शाळेचे विद्यार्थी

## महिला विभाग (सौ. स्वाती कदम) -

संस्थेचे २६ गावात ६० बचतगट आहेत. काही गटांची पुनर्रचना करण्यात आली आहे. बैठकांची मासिक सुसूत्रता व १० बचत गटांच्या साप्ताहिक बैठका दशसुत्री पद्धतीने यावर्षी घेतल्या जात होत्या. त्यातून महिलांमध्ये परस्पर समन्वय निर्माण होत आहे. सावरगाव येथे २२ महिलांना रजई प्रशिक्षण, दागिने निर्मिती, पेपर पिशव्या, कापडी पिशव्या प्रशिक्षण व उत्पादन असे विविध प्रशिक्षणाचे व उत्पादनाचे काम केले गेले. पिठाची गिरणी, कापड दुकान, मिरची कांडप, हळद, खारिक खोबरे मशीन, शेवई मशीन व्यवसायासाठी एकूण अडीच लाखांचे कर्ज महिलांनी घेतले असून त्यातून व्यवसाय सुरु केले आहेत. त्याचप्रमाणे विक्रीसाठी भीमथडी जत्रा (२६ डिसेंबर) पवनाथडी, शैलेश सोसायटी, सावित्री जत्रेत सहभाग घेतला व सव्वालाखाची विक्री करण्यात यश आले.

अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी, महिला दिन, सावित्री जयंती, हळदी कुंकू असे विविध कार्यक्रम घेण्यात आले त्यात एकूण उपस्थिती ३५२ होती.



**वनवासी बांधवांना दिवाळीनिमित्त फराळ व कपडे वाटप**



**सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महिला मेळावा**



**दागिने तयार करण्याचे प्रशिक्षण**



**शिलाई प्रशिक्षण**



**रजई निर्मिती**



**ज्येष्ठांकडून तरुणींना मार्गदर्शन**

## अन्य उपक्रम (श्री. प्रदीप पाटील)

सार्वजानिक गणेशोत्सवांची स्पर्धा तालुक्याचे आकर्षण व सामाजिक भान जाणीव वाढवणारा उपक्रम ठरत आहे. त्याचबरोबर यावर्षी जोर स्पर्धा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त सायकल स्पर्धा प्रथमच घेण्यात आली. श्री मोहन शेटे यांचे भाषण झाले. एच.एस.बी.सी. च्या माध्यमातून १४ शाळात स्वच्छ पाणी यंत्रणा, १९ शाळात स्वच्छतागृह दुरुस्ती, रोटरी शनिवारवाडा व हेरिटेज च्या माध्यमातून रायला. शनिवारवाडा रोटरी क्लब तर्फे शाळेत शालेय साहित्य वाटप, वनवासी बांधवांसाठी सेवा सहयोगच्या सहाय्याने दप्तर व वह्या वाटप, ऑलस्क्रीप्टच्या माध्यमातून धान्य संकलन, के.पी.आय.टी. च्या माध्यमातून दुष्काळी मराठवाड्यात धान्य वितरण. असे अनेक विषय हाताळले गेले.

यावर्षी सहा महिन्यासाठी सासवडच्या सौ. कल्पना खांडेकर यांनी आपल्या संस्थेत सेवा दिली. त्याच प्रमाणे दिल्ली - दुबईत मोठ्या प्रमाणावर आपला ठसा उमटवणारे श्री. सुनिल पारखी यांनी स्वतःला झोकून देऊन संस्थेच्या कामात सुसूत्रता आणण्याचे व कार्यपद्धती विकसित करण्याचे चांगले प्रयत्न केले. त्यामुळे एकूणच संस्थेतील संचालक व कार्यकर्ते यांच्यात वेगळे चैतन्य निर्माण झाले आहे. त्याचा परिणाम  संस्था संचालनात नक्कीच होईल. याच माध्यमातून संस्थेच्या सर्व देणगीदार व सहानुभूतीदार यांचे एक स्नेहसंमेलन हॉटेल श्रेयसमध्ये आयोजित करण्यात आले होते. या निमित्ताने समाजात एक व्यापक संपर्क निर्माण झाला आहे. त्याचा उपयोग भविष्यात नक्कीच होईल असे वाटते.

अर्थ सहाय्य - य. स. अध्ये, सुनिल रायबागी, सुधीर धोते, वझे कुटूंबीय, अरविंद बागाईतकर, सुनिल पारखी, भारती पागे, के.पी.आय.टी., एच.एस.बी.सी., जानकी एज्यु. ट्रस्ट, रविंद्र देवधर, दांडेकर ट्रस्ट, रवजीत बोमराह, बिपीन काबरा, शशांक वैद्य, विश्वजीत झंवर (वीट दान)

हितचिंतक मेळावा २६ फेब्रुवारी २०१६










**राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्था**

हर नगर ग्राम में दीप से दीप जलाएंगे।

गट क्र. २९७, प्लॉट क्र. २२ अ, दत्त मंदिराजवळ, अंबडवेट, ता. मुळशी, जि. पुणे ४१२ १०८. (भारत)

भ्रमणध्वनी : प्रदीप पाटील ७३८७५ ४३४७८. ईमेल : mail4rsgs@gmail.com **www.mulshigramvikas.org**

Regd No. F/11564/Pune

संपर्क : अनिल व्यास ८८८८८७१३१०, सौ. पूनम मेहता ९४२२० ८८६८४, रवींद्र देव ९८२२० ९८०५३, प्रदीप कुलकर्णी ९८५०८ ८६०६४.


GRAFFI/July 2016